| MHAH180034462021 | नियमीत दिवाणी दावा क्र.८७२/२०२१<br>नितेश शिरीष परदेशी<br>वि.<br>शिरीष नारायण परदेशी वै. |
|---|---|

## निशाणी २४ खाली आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा सी. पी. सी. ऑर्डर ६ रूल १७ प्रमाणे दावा दुरूस्त होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जासोबत वादी यांनी शपथपत्र दाखल केले आहे.

२. वादी यांचे कथन की, प्रस्तुत दावा हा प्रतिवादी विरूध्द वाटप, कब्जा मिळणेसाठी व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी दाव्यामध्ये मयत मदन परदेशी यांच्या मुली यांची ७/१२ उता-यात नांवे नसल्याने व वादीस माहिती नसल्याने सदर प्रतिवादींना दाव्यात सामील करणे अनावधानाने राहुन गेले आहे. तरी सदर दाव्यामध्ये मदन परदेशी यांच्या मुली प्रतिवादी क्र.१० बरखा संजय नायक व प्रतिवादी क्र.११ मेघा राकेश गुप्ता यांना प्रतिवादीपणात सामील करणे आवश्यक व गरजेचे आहे म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे कथन की, प्रस्तुत दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात कुठलाही बदल होणार नाही याउलट दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयास मदत होईल म्हणुन अर्ज मंजुर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या अर्जास आक्षेप घेतला असुन वादी यांना सर्व प्रतिवादी बद्दल माहीती होती व त्यांचे संपर्कातही होते असे कथन केले आहे. प्रतिवादी पुढे कथन करतात की, वादी यांनी हेतुपुरस्करपणे प्रतिवादीपणात आणलेले नाही. त्यामुळे वादीचा अर्ज हा नामंजुर व्हावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला. वादी, प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दस्तऐवजाचे अवलोकन केले असता वादी यांनी दावा वाटप, कब्जा मिळणेसाठी व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी प्रतिवादींविरूध्द दाखल केला आहे. प्रतिवादी दाव्यात हजर झाले असुन त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. प्रस्तुत अर्जद्वारे वादी यांनी सदर दाव्यामध्ये मदन परदेशी यांच्या मुली प्रतिवादी क्र.१० बरखा संजय नायक व प्रतिवादी क्र.११ मेघा राकेश गुप्ता यांना प्रतिवादीपणात सामील करण्याची दुरूस्ती होऊन मिळावी म्हणुन विनंती केली आहे. अर्जात नमुद पक्षकार हे मदन परदेशी यांचे मुली असुन त्याबाबत प्रतिवादी यांनी आक्षेप घेतला नाही. दावा हा अद्याप पावेतो चौकशीसाठी प्रलंबित आहे. दावा हा वाटपासाठी असल्यामुळे भविष्यात प्रतिवादी यांची दावा मिळकतीसंदर्भात तक्रार राहु नये म्हणुन त्यांना दाव्यात शामील करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. वादी यांनी अर्जात नमुद केलेल्या मागणी प्रमाणे दुरूस्ती झाल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपात कुठलाही बदल होणार नाही. याउलट अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादी यांना दुरूस्ती कैफियत देण्याची संधी आहे. म्हणुन अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज निशाणी क्र.२४ हा मंजुर करण्यात येतो. |
| २. | वादी यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे मुदतीत सत्वर दुरूस्ती पुर्तता करावी. |

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2025.09.24 11:21:01 +0530

तारीख - २३/०९/२०२५

**[पी. एच. पाटील]**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
राहुरी.